वसई तालुका कला-क्रीडा विकास मंडळ (रजि.) आयोजित

# वसई तालुका कला-क्रीडा महोत्सव

## एकांकिका नियमावली

१) गट क्रमांक १६ व १९ यासाठी ही स्पर्धा आहे. साधारणतः कालावधी किमान ३० मिनिटे व कमाल ४० मिनिटे. नेपथ्य, प्रकाश योजना तयारीसाठी २० मिनिटाचा वेळे देण्यांत येईल. कोणत्याही बाबतीत वेळेचे उल्लंघन झाल्यास गुण कमी करण्यांत येतील. (नियम : ८,९,१० प्रमाणे) स्पॉट लाईट वा तत्सम गरजांबाबत स्पर्धेच्या आधी किमान ८ दिवस अगोदर संयोजकांशी विचार विनिमय करावा. स्पर्धेत भाग घेणाऱ्या मंडळांनी रुपये १००/- अनामत रक्कम प्रवेश पत्रिकेसोबत भरावयाचे आहे. एकांकिका सादर न केल्यास अनामत रक्कम जप्त केली जाईल. प्राथमिक फेरीसाठी स्पर्धक गटाने स्पर्धेपूर्वी १ तास अगोदर आपण हजर असल्याची नोंद संयोजकाकडे करावी. प्राथमिक फेरीत पात्र ठरणाऱ्या एकांकिकेस महोत्सवातील स्पर्धेत समाविष्ट करण्यांत येईल. पात्र न ठरणाऱ्या एकांकिकेची अनामत रक्कम जप्त करण्यांत येईल.

२) स्पर्धक संस्थेने एकांकिका लेखक / लेखिका यांची लेखी परवानगी, रंगभूमी प्रयोग परिक्षण मंडळाचे प्रमाणपत्र (सत्यप्रत) एकांकिकेच्या सुवाच्च (तीन प्रती) पात्र परिचय (चार प्रती) प्रवेशा सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) प्राथमिक फेरीत पात्र ठरणाऱ्या संस्थेस एकांकिका गुणपत्रिका देण्यांत येईल. त्यावरील रकान्यात तंत्रज्ञ व कलाकार परिचय सूची भरुन त्याच्या चार सुवाच्च प्रती सादरी करणाऱ्या दिवशी सायं. ५.०० वा. आयोजकांकडे द्यावा लागतील.

४) खास याच महोत्सवासाठी लिहिलेल्या स्थानिक लेखकाचा नवीन एकांकिकेचा लेखन पारितोषिकांसाठी विचार केला जाईल.

५) अंतिम स्पर्धा दिनांक २६,२७,२८,२९,३० डिसेंबर २०१६ रोजी सायंकाळी ६.३० वाजल्यापासून न्यू इंग्लिश स्कूल, वसई येथे घेण्यांत येतील.

६) अंतिम स्पर्धेसाठी एकांकिका सुरु होण्यापूर्वी दिलेल्या दिवशी सायंकाळी ५.३० वाजता हजर राहणे स्पर्धक संस्थाना बंधनकारक आहे. हजर न राहिल्यास स्पर्धेतून बाद करण्यांत येईल. सोडत पध्दतीने चिठ्ठ्या उचलून त्या दिवशीचे सादरीकरणाचे क्रम ठरविण्यांत येतील. पहिली एकांकिका सादरीकरणासाठी संस्थेला स्टेजचा ताबा ६.४० वाजता दिला जाईल तसेच ७.०५ वा. एकांकिका सुरु करणे आवश्यक राहील.

७) आयोजकातर्फे प्रकाश योजनेसाठी ८ स्पॉट, ४ डिमर, जनरल लाईट्स आणि नेपथ्यासाठी ६ x ४ - ९" २ लेव्हल, ६ x ४- १$^{१}/_{२}$ २ लेव्हल, १$^{१}/_{२}$ x १$^{१}/_{२}$ ठोकले. दरवाजा फ्रेम १, खिडकी फ्रेम १, पाठीमागे निळा किंवा पांढरा पडदा विनामूल्य पुरविला जाईल. विशिष्ट प्रकारचे नेपथ्य व प्रकाश योजना असल्यास संबंधीत स्पर्धक संस्थेने स्व खर्चाने करावयाची आहे. नेपथ्य व प्रकाश योजना कितीही मोठी असली तरीही नियम (८,९,१० ) प्रमाणे वेळेचे बंधन पाळावेच लागेल याची नोंद घ्यावी.

८) रंगभूषा व वेशभूषा तयार करुन असलेल्या स्पर्धक संस्थेला रंगमंचावर प्रवेश दिल्यापासून एका तासाच्या आत त्यांनी आपली एकांकिका संपूर्ण सादर करावायची आहे. त्या दिलेल्या एक तासाच्या आतच त्यांनी नेपथ्य व प्रकाश योजना, पार्श्वसंगीत आदी सर्व व्यवस्था करावयाची आहे.

९) रंगमंचावर प्रवेश दिल्यावर वेळ दिली जाईल (वेळेची नोंद केली जाईल) हिरवा सिग्नल देऊन पहिली घंटा आयोजकांतर्फे दिली जाईल. दुसरी व तिसरी घंटा स्पर्धक संस्थानी द्यावयाची आहे. मात्र तिसरी घंटा होताच एकांकिकेला सुरुवात होणे आवश्यक आहे. बरोबर ५५ मिनिटांनी पिवळा सिग्नल दिला जाईल. ६० मिनिटे पूर्ण होताच लाल सिग्नल दिला जाईल. व इशारा घंटी वाजविण्यात येईल. त्या नंतरच्या अतिरिक्त वेळेला १ मिनिटाला २ गुण कमी २ मिनिटाला ५ गुण कमी. ३ मिनिटाला ८ गुण कमी ४ मिनिटाला १२ गुण कमी. ५ मिनिटाला २० गुण कमी केले जातील. ५ मिनिटाच्यावर गेल्यास ती एकांकिका स्पर्धेतून सांघिक व वैयक्तीक पारितोषिक देण्यास बाद ठरविली जाईल. कुठलीही एकांकिका स्टेज ताब्यात दिल्यापासून २५ मिनिटात सादरीकरण सुरु न केल्यास एकांकिका बाद ठरवून प्रयोग करुन दिला जाणार नाही.

१०) एकांकिकेचे सादरीकरण कमीत कमी ३० मिनिटे. जास्तीत जास्त ४० मिनिटे असणे आवश्यक आहे. जर सादरी करण कमी वा जास्त झाले तर नियम ९ प्रमाणे प्रत्येक कमी वा जास्त मिनिटाला गुण कमी केले जातील.

११) अंतिम फेरीत निवड झालेल्या एकांकिकेच्या विषयाला अनुसरुन भिंतीपत्र (पोस्टर) बनवून दिनांक २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजकांनी दिलेल्या जागेवर लावावे. भिंतीचित्र संगणक किंवा कोणत्याही छपाई यंत्राच्या साह्याने बनविलेले नसावे. त्याची साईज ३ X ३ असावी. उत्कृष्ट भिंतीपत्रकास विशेष पारितोषिक दिले जाईल.

१२) परिक्षकांचा निर्णय अंतिम असेल व तो सर्व स्पर्धक संस्थाना मान्य करावा लागेल.

१३) कार्यक्रमात आणि नियमात बदल करण्याचा अधिकार आयोजकांना असेल व तो सर्व स्पर्धक संस्थाना मान्य कारावा लागेल.

**वरील सर्व नियम आम्ही स्पर्धक संस्थानी वाचले असून समजून घेतले आहेत. व ते आम्हाला मान्य आहेत.**

संस्था/मंडळाचे नांव

प्रमुखाचे नांव व सही